# University of Mumbai

Phone : 022 - 2261 89 87
022 - 2270 87 38
Email ID : supt.statunit@gmail.com

<u>अत्यंत महत्वाचे</u>

सांख्यिकी कक्ष,
फोर्ट,
मुंबई - ४०० ०३२.

**No.UDSTAT/ICD/2014-15/223of 2015**

<u>परिपत्रक :-</u>

विषय : <u>AISHE, MIS व मुंबई विद्यापीठाने विकसित केलेल्या Online विद्यार्थी नोंदणी (Students on Roll) बाबत कार्यशाळा.</u>

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, वसई, पालघर व रायगड यांचे सर्व प्राचार्य व संचालक यांचे लक्ष वरील संदर्भिय पत्रांकडे वेधण्यात येते.

सदर पत्रांनुसार उपरोक्त जिल्हयातील महाविद्यालयामधील २०१४-१५ या शैक्षणिक वर्षातील AISHE, MIS व Student on Roll बाबत ऑनलाईन सर्व्हेक्षणाची सन २०१४-१५ची माहिती त्या त्या विहीत नमुन्यात पाठविण्याची विनंती करण्यात आली आहे.

उपरोक्त ठिकाणी नमुद केलेल्या जिल्हयातील व संलग्नित महाविद्यालये/संस्थां यांनी सन २०१४-१५ बाबतची माहिती त्वरीत अपलोड करण्याबाबत सूचना देण्यासाठी व माहिती अपलोड करताना येणा-या अडचणी दूर करण्याकरिता **<u>बुधवार दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी दुपारी ०२.०० वाजता मुंबई विद्यापीठ, दिक्षांत सभागृह, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२</u>** येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती. सदर कार्यशाळेस अनेक महाविद्यालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते. परंतु काही महाविद्यालयांची अद्यापही सदर पोर्टलवर नोंदणी न केल्यामुळे संबंधित पोर्टलवर माहिती प्राप्त झालेली नाही.

तरी सदर महाविद्यालयांकरिता पुन:श्च **<u>सोमवार दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ रोजी ठिक दुपारी २.०० वाजता मुंबई विद्यापीठ, दिक्षांत सभागृह, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२ येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली आहे.</u>**

तरी सदर कार्यशाळेस श्री. अतुल भणगे, नोडल अधिकारी, महाराष्ट्र राज्य व सांख्यिकी अधिकारी, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे हजर राहून मार्गदर्शन करणार आहेत.

तरी या कार्यशाळेकरिता आपल्या महाविद्यालयातील/संस्थेतील नेमण्यात आलेले नोडल अधिकारी व डाटा एंट्री ऑपरेटर यांना **<u>सोमवार दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ रोजी ठिक दुपारी २.०० वाजता मुंबई विद्यापीठ, दिक्षांत सभागृह, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२ येथे</u>** उपस्थित राहण्याचे आदेश दयावेत.

मुंबई - ४०० ०३२
दिनांक :३ फेब्रुवारी, २०१५

उपकुलसचिव,
(जनसंपर्क विभाग/सांख्यिकी कक्ष)

---

<u>प्रत रवाना माहितीकरिता रवाना :-</u>

१) संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११ ००१.
२) सहसंचालक, (उच्च शिक्षण), मुंबई विभाग, एलफिस्टन तंत्रविद्यालय आवार, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१.
३) विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण), कोकण विभाग, शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि. रायगड - ४१० २०६.
४) स्विय सहायक, कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००३२.
५) स्विय सहायक, प्र. कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००३२.
६) [illegible]